# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

P.R.O. Office,Palghar
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com

**प्रेसनोट क्र. ४८२ दिनांक २९/०५/२०२०**

## मोबाईल तसेच मोटारसायकल चोरीच्या गुन्हयातील आरोपीतास अटक करण्यात सफाळा पोलीसांना यश

दिनांक ०१/०३/२०२० रोजी २०.२० वाजताचे सुमारास पाटीलपाडा, मायखोप येथे मायखोप गावात जाणा-या रोडवर चालत जात असताना फिर्यादी कु.दिपाली चिंतामण पाटील यांचा एक ओपो ए ५ कंपनीचा मोबाईल कोणीतरी अज्ञात चोरटयाने हिसकावुन चोरुन नेलेला होता. त्याबाबत सफाळा पोलीस ठाणे गु.र.नं. I २१/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३९२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्हा तांत्रिक विश्लेषण व कौशल्यपुर्ण तपासाअंती व मिळालेल्या गुप्त माहितीच्या आधारे उघडकीस आणण्यास सफाळा पोलीस ठाण्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना यश प्राप्त झालेले आहे. सदर गुन्हयात आरोपीत अंगराज अमर सोनावणे वय २० वर्षे रा. मु.पो.तांदुळवाडी ता.जि. पालघर याने सदरचा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यास गुन्हयात अटक करण्यात आलेली आहे. त्याच्याकडुन सदरचा मोबाईल विकत घेऊन वापरणारा १७ वर्षीय विधी संघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेऊन त्याच्याकडुन गुन्हयातील गेला माल ओपो ए-५ कंपनीचा मोबाईल हस्तगत करण्यात आला आहे.

तसेच सदर आरोपीताने तपासादरम्यान सुमारे तीन महिण्यांपुर्वी वाणगाव येथुन मोटारसायकल देखील चोरल्याचे कबुल केले आहे. वाणगाव पोलीस ठाणे येथे काळया रंगाची होन्डा शाईन मोटारसायकल चोरी झाले बाबत गु.रजि.नं.३९/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल आहे. सदरची मोटारसायकल देखील सफाळा पोलीसांकडुन हस्तगत करण्यात आलेली आहे.

सदरची कारवाई ही प्रभारी अधिकारी सपोनि/सुनिल जाधव यांचे मार्गदर्शनाखाली पो.हवा/९२ महेंद्र शर्मा, पो.हवा/१६९ विश्वास संखे, पो.कॉ/१६७३ अमर गायकवाड यांनी केलेली आहे.

Scanned by CamScanner